



e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष ३रे

www.metrocityvrutant.in | शुक्रवार दिनांक 17/01/२०२५ | METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 23 ‖ RNI - MAHMAR/2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स नोकरी निर्माण करणारे बनवणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

मुंबई : विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स महाराष्ट्राच्या नवकल्पना स्टार्टअपला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. ग्रामीण भागातील नव कल्पना असलेल्या तरुणांनाचा उद्योगात सहभाग वाढवणार असून उद्योजकांना मार्गदर्शन, नेटवर्किंग, कायदेशीर सहाय्य इत्यादी सेवा देणाऱ्या इन्क्युबेटर्सना स्टार्टअप सुरू करण्यासाठी सहकार्य करणार. शासकीय आणि खाजगी विद्यापीठे या भविष्यातील स्टार्टअपला बळकटीकरण देणाऱ्या संस्था आहेत. विद्यापीठे आणि इन्क्युबेटर्स हे नोकरी शोधणारे नव्हे तर निर्माण करणारे बनवणार अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्यावतीने एम्पॉवरींग इनोव्हेशन, एलिव्हेटिंग महाराष्ट्र या संकल्पनेवर आधारित 'राष्ट्रीय स्टार्टअप दिवस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. ते म्हणाले की, सिडबी (एसआयडीबीआय) स्मॉल इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया) कडून स्टार्ट अपसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक प्रादेशिक विभागाला तीस कोटी रुपयांची तरतूद करणार आहे. काळाची गरज ओळखून स्टार्ट अप धोरणाचा नवीन मसुदा तयार केला आहे. उद्योजकांना सूचनांसाठी हा मसुदा उपलब्ध करून देण्यात आला आहे हे देशातील



आधुनिक धोरण ठरणार तसेच राज्यात नाविन्यता शहराची स्थापना करणार आहे असं त्यांनी घोषित केले.

तसेच नवं उद्योजक आणि महिला उद्योजकांच्या नवकल्पना सक्षम करून महाराष्ट्राची उन्नती करण्यात येणार आहे. देशात स्टार्टअप सुरू झाले तेव्हा ४७१ स्टार्ट अप होते आज देशात १ लाख ५७ हजार आहेत.

महाराष्ट्र केवळ भारताच्या स्टार्टअप क्रांतीत सहभागी नाही तर त्याचे नेतृत्व करत आहे. राज्यात २६००० स्टार्ट अप आहेत.

आपण असे अभियान राबवित आहोत की ज्यामध्ये महिला स्टार्टअप मध्ये सर्व पदांवर असतील. देशात जास्त महिला डायरेक्टर असलेले महाराष्ट्र हे पहिलं राज्य आहे.

स्टार्टअपमध्ये महाराष्ट्र पहिल्या सात राज्यात आहे असंही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# अभिनेता सैफ अली खानवर हल्ला! काय आहे प्रकरण..

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

अभिनेता सैफ अली खान व करीना कपूर यांच्या मुंबईतील वांद्रे (पश्चिम) येथील घरी दरोड्याचा प्रयत्न झाला. चोरटा आधी मदतनीसच्या खोलीत शिरला, तिचा आरडाओरडा ऐकून सैफ तिथे पोहोचला. चोरट्याने सैफवर चाकूने हल्ला केला. त्याला हात व मणक्याला जखमा झाल्या आहेत. सैफवर लीलावती रुग्णालयात शस्त्रक्रिया झाली असून आता त्याची प्रकृती स्थिर आहे.मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरुवातीच्या तपासात असं दिसतंय की हल्लेखोराने चोरीच्या उद्देशाने इमारतीच्या फायर एस्केप पायऱ्यांचा वापर करून सैफ



अली खानच्या घरात प्रवेश केला होता. ही घटना मध्यरात्री अडीच वाजता घडली. चोरट्याला पाहून घरातील मदतनीसने आरडाओरडा करत मदतीसाठी अलार्म वाजवला. यानंतर सैफ अली खान खोलीत गेला, तिथे त्याची चोरट्याबरोबर झटापट झाली, यादरम्यान त्याने सैफवर सहा वेळा चाकूने वार केले. तसेच घरातील मदतनीसही जखमी झाली आहे, तिच्या हाताला किरकोळ दुखापत झाली. त्यानंतर घुसखोर घटनास्थळावरून पळून गेला आणि त्याला शोधण्यासाठी पोलिसांनी १० पथके तयार केली आहेत."एक आरोपी सैफ अली खानच्या घरात घुसल्याची घटना रात्री घडली. फायर एस्केप पायऱ्यांचा वापर करून तो घरात घुसला होता. हा घरफोडीचा प्रयत्न असल्याचं दिसतंय. या आरोपीची ओळख पटली आहे, आणि सध्या १० टीम या प्रकरणाचा तपास करत आहेत," अशी माहिती तेथील पोलीस उपायुक्त दीक्षित गेडाम यांनी दिली.



मला असं वाटतं की, देशातल्या मेगा सिटीमध्ये सर्वात सुरक्षित मुंबई आहे. हे खरं आहे की कधी कधी काही घटना घडतात. त्यांना गंभीरतेने देखील घेतलं पाहिजे.
पण फक्त त्या घटनांमुळे मुंबई असुरक्षित आहे असं म्हणणं योग्य होणार नाही कारण यामुळे मुंबईची प्रतिमा खराब होते. पण ते अधिक सुरक्षित राहिलं पाहिजे याकरिता सरकार नक्की प्रयत्न करेल.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**



कायदा सुव्यवस्था किती ढासाळतेय हे लक्षात येतंय. याच भागात एकाची हत्या झाली, हा हत्येचा दुसरा प्रयत्न आहे. या सगळ्या गोष्टी चिंताजनक आहे.
राज्य सराकरने विशेषतः मुख्यमंत्र्यांनी जे गृहमंत्री आहेत, त्यांनी याकडे गांभीर्याने पाहावं.


**- शरद पवार, जेष्ठ नेते**

# शहरात वाढणार गुलाबी रिक्षांची संख्या !



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शहरातील गरजू महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी गुलाबी (पिंक) रिक्षा खरेदी करण्यास अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. राज्य सरकारने नुकतीच ‘पिंक ई रिक्षा’ ही योजना राज्यात लागू केली आहे. त्याची अंमलबजावणी महापालिकेकडून केली जाणार आहे.ई-रिक्षाची किंमत तीन लाख ७३ हजार आहे. त्यापैकी लाभार्थी महिलांनी केवळ ३७ हजार ३०० रुपये भरायचे आहेत. शासनाकडून ७४ हजार ६०० रुपये दिले जाणार आहेत. या रिक्षासाठी कर्जाचा व्याजदर ९.३ अधिक २.७५ टक्के असून संबंधित महिलांनी पाच वर्षांमध्ये महिन्याला सहा हजार रुपयांचा हप्ता भरून याची परतफेड करायची आहे. पिंक ई-रिक्षाच्या दर तीन महिन्यांनी एक याप्रमाणे पाच वर्षांसाठी २० दुरुस्ती सेवा (सर्व्हिसिंग) देखील मोफत दिल्या जाणार आहेत.पिंक रिक्षा योजनेमुळे गरजू महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. अधिकाधिक महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी पालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांच्या समाज विकास विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन पुणे महापालिकेच्या समाजकल्याण विभागाचे उपायुक्त नितीन उदास यांनी केले आहे.




# पानिपत शौर्य दिनानिमित्त मराठा वीरांना आदरांजली

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: पानिपत युद्धाचा हा 265 वा स्मृतिदिन व पानिपतच्या युद्धात बलिदान देणाऱ्या मराठा वीरांना महादजी शिंदे छत्री, वानवडी येथे पानिपत शौर्य दिनानिमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. त्याचप्रमाणे ग्वाल्हेरच्या महाराणी व ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या मातोश्री माधवीराजे सिंधिया यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली . पानिपत शौर्य दिन कार्यक्रमाचे आयोजन उत्तमराव शिंदे सरकार यांच्यावतीने करण्यात आले होते .

यावेळी सदानंदजी मोरे ( जगतगुरु संत तुकाराम महारानांचे वंशज, इतिहास तज्ञ), पांडुरंगजी बलकवडे (ज्येष्ठ इतिहास तज्ञ), प्रशांतजी जगताप ( माजी उपमहापौर, पुणे मनपा), अँड विकास खामकर (विद्यमान अध्यक्ष, पुणे बार असोसिएशन) , अँड विकास ढगे पाटिल (माजी अध्यक्ष, पुणे बार असो), आबासाहेब पाटिल (प्रसिद्ध शिवव्याख्याते), रणवीर सत्यपाल शिंदे सरकार (नाशिक), राजाभाऊ राऊत (उद्योजक ), राजाभाऊ कोटमे (व्यवस्थापक, कोटमगाव ), माजी



आमदार जगदिराजी मूळीक. मोहनरावजी शिंदे सरकार, विशाल पाटिल, अँड प्रवीण जी गायकवाड, चंद्रकांत शितोळे , उत्तमरावजी मांढरे, यशवंतजी भोसले, प्रा. प्रकाश दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.महापराक्रमी महाराज महादजी शिंदे यांच्या मंदिरातील पुतळ्यास् मान्यवरांकडून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

नंतर मान्यवरांच्या शुभहस्ते पानिपतच्या पवित्र मातीचे कलशपूजन केले.

स्वर्गीय राजमाता माधवीराजे माधवरावजी सिंदिया यांना आदरांजली अर्पण करण्यात आले. सदानंदजी मोरे ( जगतगुरु संत तुकाराम महारानांचे वंशज, इतिहास तज्ञ) यांनी या वेळी पानिपत युद्धाची गाथा काही अनुभव सांगितले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजक उत्तमराव शिंदे सरकार आणि स्थानिक नागरिकांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# "टीम नॅशोर्न्स"ची अकरा पदकांची कमाई,भारतात प्रथम क्रमांक

## 'एसएई इंडिया चॅम्पियनशिप एम-बाहा' राष्ट्रीय स्पर्धेत पीसीसीओईआरचा प्रथम क्रमांक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनियर्स यांच्या वतीने आयोजित केलेल्या एसएई इंडिया एम-बाहा २०२५ या राष्ट्रीय स्पर्धेत रावेत येथील पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) च्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) मधील मेकॅनिकल विभागातील "टीम नॅशोर्न्स" एकूण अकरा पदकांची कमाई करत भारतात प्रथम क्रमांक मिळवला. या स्पर्धेत देशभरातील पन्नासहून अधिक नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेच्या १७ व्या आवृत्तीत आयोजकांनी ट्रॅकमध्ये बदल केला होता आणि त्यात नवीन बिट समाविष्ट केले होते. टीम नॅशोर्न्सने ड्युरेबिलिटी, फिझीकल डायनॅमिक्स, स्टॅटिक इन्फॉर्मेशन, प्रोडक्शन कॉस्ट, मॅन्युव्हेरेबिलिटी, डिझाइन, व्हॅलीडेशन अशा ७ विविध विभागात प्रथम क्रमांक व सस्पेन्शन व ट्रॅक्शन, व्हर्च्युअल डायनॅमिक, ऍक्सलरेशन अशा ३ विभागात द्वितीय क्रमांक आणि प्रा. सुखदिप चौगुले यांना द्रोणाचार्य परितोषिक अशा वेगवेगळ्या कसोट्यांमध्ये उज्ज्वल यश संपादन भारतात प्रथम क्रमांक मिळवून या स्पर्धेत २ लाख ७५ हजार रुपयांची पारितोषिके मिळवली. मध्यप्रदेशातील पिथमपूर येथे या राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.




गेली अनेक वर्षे पीसीसीओईआरचे विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सातत्याने यश संपादन करीत आहेत. या चुरशीच्या स्पर्धेसाठी विद्यार्थी व मेकॅनिकल विभागाचे प्राध्यापक वर्षभर तयारी करीत असतात. प्रत्यक्ष स्पर्धा-वाहन बनविण्यासाठी महाविद्यालयाकडून आवश्यक निधी, सोयी-सुविधा, साहित्य आणि मार्गदर्शन मिळते.

स्पर्धेत सहभागी होऊन नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या आदित्य सुतार (कर्णधार व चालक ), आयुष वंदेकर (उपकर्णधार), साजिद मुलानी (चालक) सह २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. संघाची ही कामगिरी पाहून, आनंद ग्रुप व रेनो निस्सान ऑटोमोटिव्ह इंडिया या कंपन्यांनी विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया सुरु केली आहे.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. हरिश तिवारी, विभागप्रमुख डॉ. गुलाब सिरस्कर यांनी विजयी विद्यार्थांचे व संघाचे मार्गदर्शक प्रा. सुखदिप चौगुले यांचे अभिनंदन केले.

# निगडीत अवतरले स्वामी विवेकानंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

निगडी (प्रतिनिधी )डोक्याला भगवा फेटा, अंगावर लांबसडक असे भगवे वस्त्र परिधान करून अगदी हुबेहूब पोशाखात निगडीत अवतरले युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद.डॉ. दत्तात्रय खुणे असे स्वामीजींची भूमिका साकारणाऱ्या प्राध्यापकांचे नाव आहे.

निमित्त होते स्वामी विवेकानंद जयंतीचे.

निगडी येथील कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे डॉ अरविंद तेलंग वरिष्ठ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय युवा दिनाचे आयोजन वाणिज्य विभागाच्या वतीने करण्यात आले होते.

महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ. दत्तात्रय खुणे यांनी स्वामी विवेकानंदाच्या पेहरावात आले आणि आपले विचार मांडले. अगदी स्वामीसारखी सारखीच देहबोली, स्वामी विवेकानंदाचे बालपण, बालपणातील त्यांच्या आठवणी ,गुरू रामकृष्ण परमहंस यांच्यातील गुरु शिष्याचे दृढ नाते यांच्यातील स्नेहसंबंध, संवाद, आणि शिकवण हे विचार मांडताना प्रसंग हुबेहूब उभे केले. मानवी जीवनात ध्यानाचे आणि एकाग्रतेचे अमूल्य महत्त्व असल्याचे सांगितले. बालविवाह आणि स्त्री मुक्ती , गोरगरीब दलितांसाठी असणारे आरक्षण यांचे समर्थन, आणि हिंदू-मुस्लिम समन्वय हवा याविषयी त्यांचे विचार मांडले.

धर्म परिषद उरकून अमेरिकेतून भारतात आल्यानंतर भारतीय युवकांना चला उठा , जागे व्हा आणि




ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका अशी हाक दिली. त्या प्रसंगाची आठवण करून दिली.कार्यक्रम संपल्यावर विद्यार्थ्यांनी सेल्फी घेण्यासाठी गर्दी केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ प्रकाश पाटील यांचे सहकार्य लाभले .कार्यक्रमाचे आयोजन प्रा ज्योती वाणी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा आरती शेगोकार यांनी तर आभार प्रा शुभांगी गायकवाड यांनी मानले.

# सायबर चोरट्यांकडून दोघांची २८ लाखांची फसवणूक

पुणे : जादा कमाईचे आमिष आणि अर्धवेळ नोकरीच्या आमिषाने सायबर चोरट्यांकडून हडपसर परिसरातील दोघांची २८ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. जादा कमाईचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी एकाला तब्बल १५ लाख १५ हजारांचा ऑनलाईन गंडा घातला. ही घटना १० सप्टेंबर ते ११ नोव्हेंबर २०२३ कालावधीत हडपसरमध्ये घडली आहे. याप्रकरणी दर्शन धार्मिक (वय ४३) यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार हडपसर पोलिसांनी मोबाइलधारक चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दर्शन हे हडपसरमध्ये राहायला असून, सायबर चोरट्यांनी १० सप्टेंबर २०२३ मध्ये त्यांना दूरध्वनी केला. त्यांचा विश्वास संपादित करून वेळोवेळी प्रीपेड टास्क देऊन पूर्ण करण्यास सांगितले. त्याबदल्यात किरकोळ स्वरूपात परतावा दिला. त्यामुळे दर्शन यांनी गुंतवणूक करण्यास सुरूवात केली. सायबर चोरट्यांनी त्यांना जादा कमाईचे आमिष दाखविल्यांनतर दर्शनने वेळोवेळी गुंतवणूक केली. तब्बल १५ लाखांहून अधिक रकमेची गुंतवणूक केल्यानंतरही त्यांना परतावा मिळाला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यांनतर त्यांनी तक्रार नोंदविली. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# मोटारीला दुचाकीची धडक; तरुणाचा मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चारचाकी वाहनाला दुचाकीने धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील तरुणाचा मृत्यू झाला. एकजण गंभीर जखमी झाला. मुळशी तालुक्यातील म्हाळुंगे नांदे रस्ता येथील शहीद सोपान पाडळेनगर येथे रविवारी (दि.१२) रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास ही घटना घडली.

अल्ताफ शेख (२१, रा. मुळशी) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोहनलाल भाकरराम देवाशी (३०, रा. म्हाळुंगे गाव, ता. मुळशी) यांनी याप्रकरणी मंगळवारी (दि. १४) बावधन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. प्रणव उमेश टाक (१९, रा. म्हाळुंगे नांद येथील पाडळेनगर येथे हा अपघात घडला.

या अपघातात दुचाकी चालकांचा मोटारीला धडकून मृत्यू झाला. म्हाळुंगे गाव, ता. मुळशी) याच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. फिर्यादी सोहनलाल हे त्यांच्या भावाचे दुकान बंद करून दुकानातील सामान ठेवण्यासाठी चारचाकी गाडी घेऊन गेले होते. त्यावेळी प्रणव याने त्याच्या ताब्यातील दुचाकीने चारचाकी गाडीला जोरात धडक दिली. यामध्ये प्रणव गंभीर जखमी झाला. दुचाकीवरील अल्ताफ शेख याचा मृत्यू झाला. सहायक पोलिस निरीक्षक विजयकुमार धुमाळ तपास करीत आहेत.




# पिंपरीमध्ये लघुशंका करणाऱ्या तरुणावर चाकूने वार

लघुशंका करणाऱ्या तरुणाला हटकले. त्याचा जाब विचारल्याने तरुणावर चाकूने वार केले. पिंपरी येथील मिलिंदनगर कमानीजवळ मंगळवारी (दि. १४) रात्री पावणेएकच्या सुमारास ही घटना घडली. भूषण राजू डुलगूच (३४, रा. काळेवाडी) यांनी या प्रकरणी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. विनोद म्हस्के (४०, रा. पिंपरी) याला या प्रकरणी पोलिसांनी अटक केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी भूषण हे मिलिंदनगर येथे कमानीजवळ लघुशंका करीत होते. त्यावेळी इथे लघुशंका करू नका, असे संशयिताने सांगितले. त्यावर 'तू कोण मला सांगणारा?' असे फिर्यादी यांनी म्हटले असता संशयिताने चावीच्या गुच्छातील चाकूने भूषण यांच्यावर वार करीत त्यांना जखमी केले. सहायक पोलिस निरीक्षक अनिल लोहार पुढील तपास करीत आहेत. पिंपरी पोलिसांनी याप्रकरणी एकाला अटक केली असून या घटनेचा अधिक तपास करण्यात येत आहे. पिंपरी आणि परिसरात घडणाऱ्या गुंडगिरी, चोरीच्या घटनांबाबत पोलिस ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. त्यामुळे असे गुन्हे करणारे गुन्हेगार पोलिसांच्या रडारावर असून योग्य वेळी पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे.

# चोरट्यांकडून आठ दुचाकी जप्त ; दोघांना अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वाहन चोरी करणाऱ्या दोघांना पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखा युनिट एकने अटक केली. त्यांच्याकडून सहा लाख ५५ हजार रुपये किमतीच्या आठ दुचाकी जप्त केल्या. चिखली, पिंपरी, भोसरी, चाकण, शिवाजीनगर, निगडी पोलिस ठाण्यातील नऊ वाहने चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



रफिक उमर जमादार (३७, रा. मोशी), नीलेश मनोहर गायकवाड (३०, रा. चिखली), अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिखली पोलिस ठाण्यात वाहन चोरीच्या एका गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेकडून केला जात होता. चिखली येथील वाहन पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार रफिक जमादार आणि नीलेश गायकवाड यांनी चोरी केली असून, त्या दुचाकी विक्री करण्यासाठी केएसबी चौक आणि एमआयडीसी ब्लॉक दोन येथे लपवून ठेवल्या असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट एकला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी दोघांना अटक करत त्यांनी लपवून ठेवलेल्या आठ दुचाकी जप्त केल्या.गुन्हे शाखा युनिट एकचे पोलिस निरीक्षक सुहास आव्हाड, उपनिरीक्षक शिवाजी कानडे, पोलिस अंमलदार मनोजकुमार कमले, सोमनाथ बोऱ्हाडे, महादेव जावळे, गणेश महाडिक, सचिन मोरे, प्रमोद हिरळकर, प्रमोद गर्जे, अजित रूपनवर, तुषार वराडे, ताजाजी पानसरे यांच्या पथकाने ही कामगिरी केली. पोलिसांकडून याप्रकरणी तपास सुरु आहे. घडलेल्या चोरीच्या घटनांमधील आरोपींना ताब्यात घेण्यासाठी पोलिस यंत्रणा सतर्क झाली आहे.




# सख्ख्या भावाने केली बहिणीच्या दागिन्यांची चोरी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पाच एकर शेतजमीन विकून जुगारात हारला असल्याने एकाने आपल्या सख्ख्या बहिणीच्या १२५ ग्राम दागिन्यांची चोरी केली. सुमारे ९ लाख ३७ हजार ५०० लाख रुपये किमतीचे दागिने लंपास करण्यात आल्याची घटना १३ जानेवारी २०२५ रोजी रजनीगंध हाउसिंग सोसायटी, वाल्हेकर वाडी, चिंचवड येथे घडली. याप्रकरणी चिंचवड पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या फिर्यादीनुसार एकाला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून नऊ लाखांचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

श्रीकांत दशरथ पांगरे (वय २९, रा. रजनीगंध हाउसिंग सोसायटी, वाल्हेकर वाडी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी श्रीकांत याला जुगार खेळण्याची लत आहे. त्याने पाच एकर शेतजमीन विकून जुगारात हारली, त्यानंतर लोकांची उधारी-उसनवारी देण्यासाठी बहिणीचे दागिने चोरले. घराचा मागील दरवाजा



कोणाच्या लक्षात येणार नाही, अशा प्रकारे मुद्दाम उघडा ठेवून घरी कोणी नसताना कपाटातील १२५ ग्राम वजनाचे दागिने चोरून त्याच्यावर कोणाचे संशय येऊ नये, म्हणून स्वतः बहिणी सोबत पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेला. त्याच्याकडून एकूण ९ लाख ३७ हजार ५०० रुपये किमतीचे १२५g वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे. सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनायक कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त शशिकांत महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त गुन्हे शाखेचे संदीप डोईफोडे, गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली शैलेश गायकवाड, गणेश माने, प्रमोद वेताळ, जयवंत राऊत, देवा राऊत, आतिश कुडके यांनी केली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968